INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

February-2022 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue 287

## Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)


For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

February-2022 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

## International E-Research Journal

**Peer Reviewed, Referred & Indexed Journal**

**Issue-287**

## Multidisciplinary Issue

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

*- Chief & Executive Editor*

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo :** Rasia's attack on Ukrain (Source-Internet)*

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 287 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
February-2022

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
**Dr. Tejesh Beldar,** Nashikroad (English)
**Dr. Gajanan Wankhede,** Kinwat (Hindi)
**Mrs. Bharati Sonawane,** Bhusawal (Marathi)
**Dr. Rajay Pawar,** Goa (Konkani)

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare** - Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse**- MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** - M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

| | | |
|---|---|---|
| 26 | हिंदी के प्रचार-प्रसार में इलेक्ट्रॉनिक माध्यमों की भूमिका (रेडिओ तथा दूरदर्शन के संदर्भमें) **डॉ.रमेशकुमार गवळी** | 130 |
| 27 | सोशल मीडिया : बदलता भारतीय परिवेश **डॉ. संगिता चित्रकोटी** | 135 |
| 28 | विद्यार्थीयों के जीवन में मराठी भाषा विषयक रुचि निर्माण करने में ग्रंथालयों की भूमिका **डॉ. वंदना जामकर** | 141 |
| | **मराठी विभाग** | |
| 29 | भारतीय आदिवासींच्या दैवत कथा **डॉ. अंजली मस्करेन्हस** | 145 |
| 30 | संत ज्ञानेश्वरांचा मानवताद **डॉ. मीनाक्षी पाटील** | 151 |
| 31 | संत एकनाथांच्या भारूडातील फिरस्ते, भटके, उपेक्षित व बहुजनांचे चित्रण **डॉ. मधुकर बैकरे** | 155 |
| 32 | प्राचीन चीन संस्कृतीमधील समाज जीवन **प्रा. एस. एस. मारकवाड** | 161 |
| 33 | तडवी बोलीचे सामाजिकीकरण **रमजान तडवी, डॉ. उज्वला भोर** | 165 |
| 34 | जोतीराव फुले : स्त्रीमुक्तीचे प्रेरक आंदोलन **डॉ. अनमोल शेंडे** | 169 |
| 35 | 'हिंदू: जगण्याची समृध्द अडगळ' कादंबरीतील स्त्री विषयक चित्रण **प्रा.गौतम भालेराव** | 174 |
| 36 | मराठी विज्ञानकथेतील स्त्री- पात्रचित्रण **डॉ. विलास धनवे** | 178 |
| 37 | आंबेडकरवाद:समकालीन संदर्भ **डॉ. सुरेश वर्धे** | 181 |
| 38 | नामदेव ढसाळांच्या कवितेतील आशय आणि विद्रोह **डॉ. धनराज माने** | 185 |
| 39 | साहित्यिक डॉ. लीला गोविलकर यांच्या कविता लेखनातील प्रतिमा व प्रेरणा **शिवाजी शिंदे** | 189 |
| 40 | अस्तित्व शोधाचा प्रवास - 'सरोवर' **प्रा. विद्या सुर्वे-बोरसे** | 197 |
| 41 | 'समाज समता संघ आणि कौटुंबिक सहभोजने' - समाज परिवर्तनाचा उपक्रम **डॉ. किशोर काजळे** | 199 |
| 42 | पुणे शहरातील निवडक ऐतिहासिक स्थळांची ऐतिहासिक चिकित्सा **डॉ. नामदेव रासकर** | 206 |
| 43 | स्वातंत्र्यपूर्व काळातील मालेगाव येथील कापड उद्योग निर्मितीचा ऐतिहासिक आढावा **डॉ. संजय शेलार, सुभाष आहिरे** | 211 |
| 44 | महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनात दबाव गटांची भूमिका : विशेष संदर्भ 'नाशिक ते मुंबई किसान लाँग मार्च' | 216 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 287 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal

E-ISSN : 2348-7143
February-2022

# स्वातंत्र्यपूर्व काळातील मालेगाव येथील कापड उद्योग निर्मितीचा ऐतिहासिक आढावा

**डॉ. संजय डी. शेलार**
संशोधन मार्गदर्शक (इतिहास)
संशोधन केंद्र, अहमदनगर जिल्हा
मराठा विद्याप्रसारक न्यू कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर
Sanjayshelar99@gmail.com
M. 9421979479

सुभाष एस. आहिरे
संशोधक विद्यार्थी, सहयोगी प्राध्यापक
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
कर्मवीर भाऊसाहेब हिरे कला, विज्ञान
व वाणिज्य महाविद्यालय, निमगाव
ता. मालेगाव जि. नाशिक
slahire66@gmail.com
M. 8149534737

**गोषवारा –**

मानवाची मुलभूत गरज रोटी, कपडा और मकान आहे, यामध्ये मानवाने कपडा आपल्या वेश - वस्त्रासाठी वापरण्यास सुरूवात केली. मानवाने कापड निर्मितीसाठी विविध शोध लावले. या कापड उद्योग निर्मितीमध्ये भारत देशातील महाराष्ट्र राज्यात नाशिक जिल्ह्यामध्ये मालेगाव याठिकाणी कापड उद्योग आज मीतीस महत्वाचा उद्योग निर्मितीचा व्यवसाय आहे. या कापड उद्योग निर्मितीचा पाया स्वातंत्र्यपूर्व काळात मालेगाव भरभराटीस आला आहे. सदर शोध निबंधामध्ये मालेगाव येथील स्वातंत्र्यपूर्व काळामधील कापड उद्योग निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे.

**शब्दसूचक –** स्वातंत्र्यपूर्व काळ, विणकर, हातमाग, यंत्रमाग, रंगीत साडी, लुंगी, कापडाचे प्रकार, बाजार, व्यापार इ.

**उद्देश –**

सदर शोधनिबंधाचा उद्देश स्वातंत्र्यपूर्व काळात मालेगाव येथे कापड विणकर व्यवसाय हिंदू व मुस्लीम धर्मातील व्यवसायकांनी सुरू केला. पेशवाईच्या उत्तरार्धात मालेगाव येथील सरदार राजेबहादूर नारो शंकर यांच्या संरजामी प्रदेशात उत्तर भारतातून विणकर कुटूंब व्यवसायीक म्हणून वास्तव्यास आले. सन 1818 पेशवाईच्या अस्तानंतर इस्ट इंडिया कंपनीच्या काळात सुती कापड व्यवसाय वाढत गेला. सन 1857 च्या उठावानंतर ब्रिटिश सत्ता राणीच्या जाहिरनाम्याने स्थापीत झाली. या काळानंतर मालेगावात उत्तर भारतातून मोठ्या प्रमाणात विणकर कुटूंबे स्थायीक झाली. मुंबई प्रांतात मालेगाव हे ठिकाण कापड निर्मिती व कापड बाजार प्रसिध्दीस आले. याकापड उद्योगाची स्वातंत्र्यपूर्वकाळामधील घडामोडींचा संदर्भ साधनाने अभ्यास करण्यासाठी थोडक्यात शोधनिबंधाच्या मार्गाने प्रयत्न केला आहे.

**गृहतिके –**

1) मालेगाव कापड उद्योग निर्मितीचे ठीकाण आहे.

2) हातगाम ते यंत्रमाग यामार्गाने कापड निर्मितीमध्ये विकास झाला आहे.

3) मालेगावात कापड निर्मितीमध्ये सुती रंगीत साडी, सुती लुंगी आणि कच्चा सुती कापड प्रक्रिया प्रसिध्द आहे.

4) मालेगावात सुती कापड निर्मिती आणि व्यापार व्यवसाय प्रगत झाला आहे.

**मालेगावातील यंत्रमाग कापड उद्योगाची वाटचाल :-**

स्वातंत्र्यपूर्वकाळापासून नाशिक जिल्ह्यातील मालेगाव हे हातमाग व नंतर यंत्रमागाचे शहर म्हणून प्रसिध्द आहे. इ.स. 1857 मध्ये ब्रिटीश सरकारविरूध्द स्वतंत्र युध्दाचा उठाव झाल्यामुळे उत्तर प्रदेशातील विणकर समाजाचा अतोनात छळ झाला. तसेच इ.स. 1864 मध्ये उत्तर भारतात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे जीवन व अर्थार्जनावार संकट आल्यामुळे तेथील मुस्लीम विणकर समाजाने रोजी रोटीचा प्रश्न सोडविण्याकरीता त्यांनी दक्षिणेकडे स्थलांतर करण्यास सुरूवात केली. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गवर असलेला नागपूर, धुळे, मालेगाव, अकोला, अमरावती, जळगांव, भिवंडी, मुंबई इत्यादी ठिकाणी ते स्थायित झाले.[1] त्यावेळी मालेगाव निंवायती ही राजेवहाद्दर नारोशंकर यांची जहागिरी होती. व्यापार उद्दीम वाढावा म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशातून आलेल्या अनेक विणकर कारागिरांना सवलती दिल्या. त्यामुळे या व्यवसायाला गती मिळून पुढे घराघरातून हातमाग दिसू लागले. म्हणून इ.स. 1857 पासून मालेगावात विणकाम सुरू झाले असल्याचे दिसून येते.

इ.स. 1857 मध्ये मालेगावातील कापड उद्योगात 50 कुटुंबे फक्त पांढऱ्या सतरंज्या (झोरे) तयार करीत ते सर्व हिंदू होते. त्यावेळी चांदवड येथे 20 व नाशिक येथे 42, हिंदू विणकर काम करत. दिंडोरी व नाशिकलाही विणकाम केले जाई. इ.स. 1886 मध्ये मालेगावात 2441 हातमाग होते त्यावर 1707 मुस्लीम व 734 हिंदू विणकाम करीत. अन्सारी विणकर येथे आहिल्याबाई होळकरांच्या काळापासून राहत असून त्यात मुबारकपर, तांडा, आझमगड, बारावंकी, बस्ती, सुलतानपूर, मौनाथभंजन, अलाहाबाद, लालगंज, येथून अन्सारी विणकर समाज समूहाने मालेगावात स्थायिक झाले.[2]

**हातमागाचे यंत्रमागात रूपांतर :-**

मालेगावात स्थायिक झालेल्या मुस्लीम समाजातील बनकरांकडे (विणकर) रंगीत साडी तयार करण्याचे परंपरागत कौशल्य असल्यामुळे त्यांनी मालेगावात हातमाग उद्योगाची सुरूवात केली. कालांतराने हातमाग व्यवसायात सुधारणा झाली. सुरूवातीला एक साडी विणण्यास तीन व्यक्तिंची आवश्यकता लागत असे. एक व्यक्ती हातमागाच्या समोर हाताचा व पायाचा उपयोग करून साडी विणण्याचे काम करीत असे तर त्याच्या उजव्या व डाव्या बाजूला दोन व्यक्ती समोर हाताचा व पायाचा उपयोग करून साडी विणण्याचे काम करीत असे तर त्याच्या उजव्या व डाव्या बाजूला दोन व्यक्ती समारो समोर घोडा (शटल) एकमेकांच्या दिशेने आळीपाळीने पाठवत असत. त्यावेळी एक हातमागावर तीन व्यक्ती काम करीत होते.[3]

इ.स. 1924 पर्यंत मालेगावात शटल नसलेला हातमाग चाले. नंतर इ.स. 1925 मध्ये संपत मिस्त्री नावाच्या व्यक्तीने सोलापूरहून शटल आणले. तेव्हापासून मालेगावात शटल असलेले हातमाग आहेत. मुंबईचे गव्हर्नर 10 मे 1926 रोजी मालेगावात आले तेव्हा त्यांनी जुन्या बसस्थानकाजवळील इस्लामपुऱ्यातील मुन्शी अव्दुल करीम मोटारवाले यांच्या घरी जावून हातमाग उद्योगाची प्रत्यक्ष पाहणी केली होती. इ.स. 1935 पूर्वी मालेगावातील साडी उत्पादन पूर्णत: हातमागाच्या साहाय्याने केले जाई. हातमागाची उत्पादन क्षमता मर्यादित असल्याने वदलत्या परिस्थितीत उत्पादन यंत्रणेत बदल करून उत्पादन खर्च कमी करणे गरजेचे होते. म्हणून इ.स. 1935 मध्ये मालेगावातील साडी उत्पादक अब्दुल रज्जाक फकीर मोहमंद यांनी डिझेल इंजिनचा वापर करून यंत्रमागाची सुरूवात केली. मालेगाव येथे प्रथम 'स्टार वीव्हिंग मिल' या नावाने यंत्रमाग व्यवसाय सुरू झाला.[4] मालेगावात यंत्रमाग आस्तित्वात येऊन हातमागाचे यंत्रमागात रूपांतर झाले.

इ.स. 1936 मध्ये 'दी अमलमेट इलेक्ट्रिकल' कंपनीने वीज पुरवठा करण्यास सुरूवात केली. ह्या वीजेचा पुरवठा स्वस्त दरात होत असे. सर्व्हिस चार्जेस नव्हते. त्यामुळे हातमागाची जागा यंत्रमागाने झपाट्याने घेतली. यंत्रमागावर रंगीत साडी विणणे सोपे व कमी वेळेचे असल्यामुळे इतर विणकरांनी देखील हातमागाचे यंत्रमागात रूपांतर केले. त्यामुळे यंत्रमागाच्या संख्येत वाढ होवू लागली. इ.स. 1936 मध्ये 10 यंत्रमाग होते. पुढे इ.स. 1940 मध्ये म्हणजे पाच वर्षात यंत्रमागाची संख्या 2000 पर्यंत पोहचली. इ.स. 1940 मध्ये 95% हातमाग तर 5% यंत्रमाग अशी स्थिती निर्माण झाली.[5]

मालेगावातील यंत्रमाग संख्या व कामगार (1935-1980)

| वर्ष | यंत्रमाग संख्या | कामगार |
|---|---|---|
| 1935 | 01 | 03 |
| 1936 | 10 | 25 |
| 1940 | 2000 | 5000 |
| 1950 | 5000 | 12500 |
| 1960 | 10084 | 12120 |
| 1970 | 21918 | 54795 |
| 1980 | 33443 | 83608 [6] |

दुसऱ्या महायुध्दामुळे कापड उद्योगात तेजी आली. नागरी व सैनिकी गरजा भागविण्यासाठी मागणी वाढली. यंत्रमाग उद्योजकांना घर, सोने – चांदी दागिने विकून गुंतवणूक केली. मुंबईमधील कापड गिरण्यांनी विकलेले भंगार बाजारातील बीम, लुम सुटे भाग अल्प किंमतीत खरेदी करून यंत्रमागाची संख्या झपाट्याने वाढत गेली.[7] नाशिक जिल्ह्यातील मालेगाव हे सर्वात मोठे यंत्रमानाचे औद्योगिक केंद्रे म्हणून पुढे आले.

**मालेगावातील यंत्रमाग कापड उत्पादन व बाजारपेठ :-**

मालेगाव रंगीत साडी, चोळीचे खण, पायजमा, सलवार बंडी व पगडी इत्यादी कापड उत्पादन केले जाई. त्याला कर्नाटक, आंध्रप्रदेश, कानपुर, तामिळनाडू व गुजरात राज्यात तर महाराष्ट्रात विशेषत: मराठावाडा, विदर्भ, खान्देश व सोलापूर येथे चांगली मागणी असे इ.स. 1857 हे 1934 या काळात मालेगाव येथे रंगीत साडी विक्रीसाठी बाजार भरत असे. या बाजारात विणकर स्वत: बाजारात येऊन साड्यांची खरेदी-विक्री समोरा समोर होई. त्यामुळे व्यवहार रोखीने होत असत. त्याशिवाय दिर्घ मूदतीचे सौदे देखील होत त्याला खंडी असे म्हणत. साधारणत: या बाजारात साडीची विक्री किंमत आठ आण्यापासून ते दीड रूपयापर्यंत असे पहिल्या महायुध्दाच्या वेळी 50 ते 100 रूपयाला विकली जाणारी साडी प्लेग, महापूर व दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीच्या काळात पंधरा-सतरा आण्यामध्ये फार कष्टाने विकावी लागत असे.[8] म्हणून मालेगावच्या या बाजाराला 'सपाटी बाजार' म्हणत असत.

इ.स. 1935 पासून सपाटी बाजाराला 'गुजरी' म्हणून नाव पडले. गुजरी म्हणजे त्याकाळी तयार मालाची विक्री करण्याचे ठिकाण होय. मालेगाव येथे सांयकाळी 4 वाजल्यापासून साडी विक्रीपाठी गुजरी भरत असे. हलक्या व भारी सुतापासून बनविलेल्या साड्या विणकर स्वत: खांद्यावर येऊन विक्रीपाठी गुजरीमध्ये येत असत. साडी विक्रेता व खरेदीदार यांच्यामध्ये आडत व्यापारी मध्यस्थी करत त्यांचा मोबदला म्हणून कमिशन

घेत असत. तीन गेज लांबीच्या साडीच्यामध्ये रेशमी जरीचे धागे असलेल्या चुणखणी साडीचे साठ आणे व पातळ साडीचे दोन आणे कमिशन व्यापारी देत असत.

**रंगीत साड्याची किंमत (1935 ते 1945)**

| साडीची प्रत | हातमाग रंगीत साडीची किंमत | यंत्रमाग रंगीत साडीची किंमत |
|---|---|---|
| भारी | सव्वा रूपया | दोन रूपये पाच आणे |
| मध्यम | बारा आणे | एक ते सव्वा रूपया |
| हलकी | आठ आणा | एक रूपया [9] |

इ.स. 1945 पासून मालेगावातील यंत्रमागावर रंगीत साडीच्या उत्पादना बरोबर सुती लुंगीचे उत्पादन होण्यास सुरूवात झाली. तसेच इ.स. 1949 मध्ये रंगीत लुंगीची निर्मिती होऊ लागली. रंगीत लुंगीची निर्मिती करणारे हसनशेठ (डबलताज), जलील इसहाक रंगारी (डबल घोडा), जावेद अहमद इकबाल अहमद (चार मिनार), हाजी मुहमंद मुस्तफा (गाईड लुंगी) या नावाने रंगीत लुंगीचे उत्पादन करीत. या रंगीत लुंगीचा धागा सुतापेक्षा अधिक मजबूत व आकर्षक असल्याने बाजारात तिला चांगली मागणी असत.[10] तसेच मालेगावात तयार होणाऱ्या सफेद पॉलिस्टर कापडला अहमदावाद, सुरत, बालोत्रा, बडोदा, मुंबई या ठिकाणी पुढील प्रकियांसाठी बाजारपेठ उपलब्ध आहेत. या कापडाची मालेगावातील दैनंदिन 6 ते 8 कोटी रूपयांची उलाढाल असून स्थानिक बाजारपेठेत सुताची 2 ते 3 कोटी रूपयांची उलाढाल आहे.[11]

**निष्कर्ष –**

सदर शोधनिबंधातून मालेगावात पेशवाईच्या उत्तरार्धात नारोशंकर राजेबहाद्दूर यांनी उत्तर भारतातून मुस्लीम, हिंदू कापड उद्योग निर्मिती करणारे व्यवसायीक आणलेत. पेशवाईच्या 1818 च्या अस्तानंतर ब्रिटिशकाळात कापड उद्योग सुरूवातीच्या काळात भरभराटीस आला. सन 1857 च्या उठावानंतर उत्तर भारतात ब्रिटिशांनी कापड उद्योग निर्मिती करणारे भारतीयांना आर्थिक त्रास देण्यास सुरूवात केली. त्यामुळे तेथील उत्तर भारतीय भारताच्या पश्चीमेकडे दिल्ली अग्रा ते मुंबई या मार्गाने येवू लागलीत. त्यातील काही कुटूंबे मालेगावात कापड निर्मितीसाठी वास्तव्यास आली. त्यातुन कापड उद्योग निर्मिती प्रक्रियेला हातमागापासुनच यंत्रमागा पर्यन्त सुरूवात होवुन मालेगाव हे ठीकाण कापड उद्योग निर्मितीसाठी प्रसिध्द झाले. सरकारी धोरणामुळे विविध अडचणीतुन कापड उद्योग उभा राहत आहे.

**संदर्भ -**

1. सिद्दीकी इलियास (डॉ.); नारोशंकर राजेबहाद्दूर आणि मालेगावाचा इतिहास (2008), सिटीजन वेलफेअर सोसायटी, खुशामदपुरा, मालेगाव, , पान नं. 218.
2. कित्ता., 219.
3. कित्ता., 129.
4. अन्सारी अब्दुल मजिद; पावरलुम संस्था मिसाल और हाल(2007), डॉ. अन्सारी अब्दुल मजिद, मालेगाव, पान नं. 94.
5. केंद्रिय यंत्रमाग उद्योग कार्यालय मालेगाव रेकॉर्ड.
6. सिद्दीकी, इलीयास, उपरोक्त 227.

7. दै. गावकरी नाशिक जिल्हा आवृत्ती दि. 9 नोव्हेंबर 2003.
8. अन्सारी अब्दुल मजिद, उपरोक्त 130.
9. सिद्दीकी इलीयास; उपरोक्त 228.
10. खैरनार, एस.डी. कायस्थ, एस. डी; भारतीय अर्थव्यवस्थापन एक दृष्टीक्षेप (2004), दिग्वीजय पब्लीकेशन, पिंपळगाव (ब) नाशिक-1, पान नं. 98.
11. कित्ता., 99.